दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ४८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१२ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज ७१ हजार रुग्णांची कोरोनावर मात


**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई: राज्यात कालच्या तुलनेत आज रुग्णसंख्येत थोडी वाढ झाली आहे. गेल्या २४ तासांत राज्यात ४० हजार ९५६ नवीन रुग्णांची भर पडली असून त्याचवेळी ७१ हजार ९६६ रुग्ण करोनावर मात करून घरी परतले आहेत. दरम्यान, आज ७९३ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला असून मृत्यूंचे वाढते प्रमाण चिंतेत भर घालणारे ठरले आहे.

राज्यात एप्रिल महिन्यात करोनाच्या दुसऱ्या लाटेचा सर्वाधिक उद्रेक पाहायला मिळाला. दैनंदिन रुग्णसंख्या रोज नवे उच्चांक गाठत होती. ही रुग्णसंख्या तब्बल ७० हजारांच्या उंबरठ्यावर पोहचली होती. त्यात आता वेगाने घट होताना दिसत आहे. सोमवारी राज्यात ३७ हजार ३२६ इतक्या नवीन रुग्णांची नोंद झाली होती. गेल्या काही आठवड्यांतील हा सर्वात निचांक ठरला होता. तर आज त्यात थोडी वाढ पाहायला मिळाली आहे. आज राज्यात ४० हजार ९५६ नवीन रुग्ण आढळले आहेत.

# अरबी समुद्रात वादळसदृश्य परिस्थिती : जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा

### १४ ते १६ मे दरम्यान ४० ते ६० किमी वेगाने वारे; समुद्र खवळलेल्या स्थितीत राहणार



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार पूर्व मध्य अरबी समुद्रात हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे वादळसदृश्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर रायगडातील समुद्र व खाडी किनाऱ्यावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात देण्यात आला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार १४ ते १६ मे यादरम्यान ४० ते ६० किमी वेगाने वारे वाहणार असल्याने समुद्र खवळलेल्या स्थितीत राहणार आहे. त्यामुळे या कालावधीत मच्छिमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, नागरिकांनी समुद्र किनार्याळवर पोहण्यासाठी जाऊ नये अशा सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या असून, समुद्र व खाडी किनार्यायवरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच वादळ किनाऱ्यावर येण्याची शक्यता विचारात घेऊन सर्व विभागांना आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करुन ठेवण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत. वूडकटर, जेसीबी, बॅटरी, जनरेटर, शोध व बचाव पथक आदी तत्पर ठेवण्यात यावे, वादळ व अतिवृष्टीमुळे जीवित व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांनी आपल्या आदेशात जारी केल्या आहेत.

## संक्षिप्त...

### सचिन वाझेची अखेर पोलीस सेवेतून हकालपट्टी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अँटिलिया स्फोटक प्रकरण आणि मनसुख हिरण मृत्यू प्रकरणात अटकेत असलेले निलंबित सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन वाझेला पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आली असल्याची माहिती मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांनी दिली आहे. मुंबई पोलीस आयुक्तांनी भारतीय राज्यघटनेच्या तरतुद ३११(२) (ब) अन्वये आज आदेश जारी केला आहे. त्यामुळे मोठा झटका सचिन वाझेला बसला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाबाहेर स्कॉर्पिओत सापडलेल्या स्फोटक प्रकरणात एनआयएने सचिन वाझेला अटक केल्यानंतर सेवेतून हकालपट्टी करण्याच्या प्रक्रियेच्या हालचालींना मुंबई पोलिसांकडून वेग आला आहे. सचिन वाझेंची शेवटची पोस्टिंग विशेष शाखेत झाली होती, त्यामुळे ही प्रक्रिया संबंधित विभागाची जबाबदारी असल्याची मुंबई पोलिसांनी म्हटलं होतं. काही दिवसांपूर्वीच विशेष शाखेचे अतिरिक्त आयुक्त सुनील कोल्हे यांनी महाराष्ट्र एटीएस आणि एनआयएला पत्र लिहून सचिन वाझेंच्या या प्रकरणातील समावेशासंबंधित कागदपत्रांची मागणी केली होती, ज्याच एफआयआर कॉपीचाही उल्लेख होता. हे कागदपत्र सोमवारीच विशेष शाखेला सोपवण्यात आले आहेत. नंतर विशेष शाखेचे अधिकारी यावर आपला अहवाल बनवून राज्य सरकारला सोपवेल आणि वाझेंवर भा. दं. वि. १९४९ च्या कलम ३११ अंतर्गत कारवाई करण्याची परवानगी मागतील, अशा चर्चा होती. मात्र अखेर आता सचिन वाझेला पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आलं आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या विनंतीनुसार शासनाने...

## ४५ वर्षावरील व्यक्तींच्या उपलब्ध लसीमधूनच दुसरा डोस देण्यासाठी दिले निर्देश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यांमध्ये कोविड–१९ चा प्रादूर्भाव आटोक्यापत आणण्यासाठी लसीकरणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने सद्य:स्थितीत केंद्र शासनामार्फत पंचेचाळीस वर्षावरील व्यक्तींच्या लसीकरणासाठी को–वॅक्सिन लसीचा पुरवठा होत नसल्याने जनतेमध्ये काहीशी नाराजी निर्माण होत आहे.

यानुषंगाने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना दि. ७ मे २०२१ च्या पत्रान्वये लेखी विनंती केली की, ४५ वर्षे वयावरील ज्या व्यक्तींचा लसीचा पहिला डोस पूर्ण झाला आहे व ज्या व्यक्ती लसीच्या दुसऱ्या डोससाठी पात्र ठरले आहेत, अशा व्यक्तींसाठी दुसरी लस ही राज्य शासनामार्फत १८ ते ४४ वयोगटातील उपलब्ध करून दिलेल्या को–वॅक्सिन लसींमधून वापरण्यात यावी. या लसी सद्य:परिस्थिती नुसार लोन बेसेसवर वापरण्यात याव्यात.



केंद्र शासनाकडून लस पुरवठा झाल्यानंतर प्राप्त लसी १८ ते ४४ वयोगटातील व्यक्तींसाठी वापरण्यात याव्यात, या संदर्भात शासनातर्फे सर्व संबंधित विभागांना आदेश निर्गमित व्हावेत.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या या वस्तुस्थितीदर्शन विनंतीपर प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांचा तात्काळ सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून दि. १० मे २०२१ रोजी अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब–कल्याण, माता व बालसंगोपन, पुणे यांच्याकडून सर्व जिल्हा परिषद जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना लेखी सूचना देण्यात आल्या आहेत की, राज्यस्तरावर राज्याच्या निधीमधून पुरवठा केलेल्या ४ लाख ७९ हजार १५० को–वॅक्सिन लसींपैकी काही लसी सध्या जिल्ह्यामध्ये उपलब्ध आहेत. या शिल्लक असलेल्या लसीचा वापर त्या त्या जिल्ह्या–तील लसीचा दुसरा डोस देय असलेल्या ४५ वर्षे वयावरील लाभार्थ्यांसाठी करण्यात यावा. सध्या पुरवठा केलेल्या व शिल्लक असलेल्या को–वॅक्सिन लसीचा वापर कोणत्याही वयोगटातील पहिल्या डोससाठी करण्यात येऊ नये व याची अंमलबजावणी दि. ११ मे २०२१ पासून करण्यात यावी.

## हलदीराम एजन्सीचे आमिष दाखवून रोह्यात तरुणाला ६ लाखाला फसवले

**दै.रायगड नगरी । रोहा**

हलदीरामची एजन्सी देतो असे सांगुन रोहा येथील तरुणाकडून साडे सहा लाख रुपयांची फसवणुक केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तिघांविरोधात रोहा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हलदीराम प्रोडक्टसची एजन्सी मिळवन देतो असे सांगणार्यु तिघांसोबत रोहा येथील तरुणाची ओळख झाली. हलदीरामची एजन्सी मिळावी असा विचार करुन या रोहेकर तरुणांने त्या तिघांवर विश्वास ठेवत व्यवहार सुरु करण्याचे ठरवले. हळदीरामच्या प्रोडक्टसाठी त्यांनी वेगवेगळ्या खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. त्यानुसार ६ लाख ६५ हजार ६०० रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतरही जेव्हा हलदीरामचे प्रोडक्टस् मिळाले नाही तेव्हा या तरुणाने आपले पैसे परत मागण्यास सुरुवात केली. फोन करून विचारणा केली असता आरोपीने पुन्हा ईन्सुरन्स चार्जेस म्हणून ८० हजार रुपयांची मागणी केली. प्रोडक्टस् किंवा पैसे दोन्ही देण्यास समोरुन टाळाटाळ होत असल्याचे लक्षात येताच शेवटी या तरुणाने रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याबाबत रोहा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करत आहेत.

## पनवेल परिसरात तीन वेगवेगळ्या अपघातात ४ जण जखमी ; वाहनांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या २४ तासात पनवेल परिसरात झालेल्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी अपघातामध्ये ४ जण जखमी झाले असून यामध्ये वाहनांचे सुद्धा नुकसान झाले आहे.

पनवेलजवळील मुंबई–गोवा महामार्गावर क्षणभर विश्रांती हॉटेल समोर पनवेल बाजूकडे जाणाऱ्या रोडवर एका भरधाव वेगातील टँकरने मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटार सायकलवरील अजित अर्जुन हवा–लदार (२६ रा.दिव गाव) व त्याचा भाऊ जितेश परशुराम हवालदार (२८) हे दोघे जखमी झाले असून त्यांच्या मोटार सायकलीचे सुद्धा नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून टँकर चालक



मोहम्मद इमामुज्जामा मोहम्मद अमिरुझामा शेख (४९ रा.वडाळा मुंबई) याला ताब्यात घेतले आहे. तर दुसऱ्या घटनेत भिवंडी ठाणे येथील अली हसन अख्तर हुसेन शेख हे चिखली, पुणे येथे जाण्यासाठी व्हॅगनार कार एमएच ०४ जियु ६२९४ ने भिवंडी येथून निघाले. ते मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर कळंबोली सर्कल पासून साडेतीन किलोमीटर अंतरावर आले असता पाठीमागून आलेल्या होंडा सिटी कार एम एच ०२ सीबी ३०९८ ने त्यांना धडक दिली. या धडकेत त्यांची मोठी मुलगी अलिषा शेख (वय १९) आणि आदीबा शेख (वय १४) या जखमी झाल्या आहेत. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर तिसऱ्या घटनेत खारघर जवळील कुटुक बंधन चौकानजिक जाणाऱ्या टेम्पा व गाडीमध्ये झालेल्या विचित्र अपघातात गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

## जेएनपीटी बंदरात सौदी अरेबियातून ८० मेट्रिक टन ऑक्सिजन दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदरात एएक्सएस कंपनीच्या एमव्ही जीएसएफ जिजेल जहाजातुन क्रायोजेनिक स्वरूपातील ८० मेट्रिक टन मेडिकल ऑक्सिजन असलेले चार कंटेनर यशस्वीपणे उतरविण्यात आले. देशातील सध्याच्या कोविड महामारीच्या परिस्थितीत संयुक्त अरब अमिरातीने भारतास मेडिकल ऑक्सिजन कंटेनरची मदत पाठविली आहे.

जीएसएफ जिजेल हे जहाज ऑक्सिजनचे चार कंटेनर घेऊन दुबईतील जेबेल अलीहून दि. ५ मे, २०२१ रोजी भारताकडे रवाना झाले होते ते आज जेएनपीटी बंदरात दाखल झाले. लिक्विड मेडिकल ऑक्सिजनचे हे कंटेनर देशातील वेगवेगळ्या ठिकाणी पाठविण्यात येतील आणि सध्याच्या कोरोणा स्थितिवर मात करण्यासाठी त्याचा उपयोग केला जाईल. भारत सरकारच्या बंदरे, नौकानयन व जलवाहतूक मंत्रालयाच्या निर्देशानुसार विदेशातून मदत घेऊन येणा–या जहाजांना जेएनपीटी बंदरामध्ये नि:शुल्क सेवा दिली जात आहे.

त्याचबरोबर ऑक्सिजन कंटेनरची विनामूल्य हाताळणी करण्यासाठी सर्व संसाधने उपलब्ध करून दिली आहेत. कोविड –१९ च्या जागतिक माहामारीच्या काळात गेले वर्षभर जेएनपीटी आपल्या



भागधारकांसोबत देशातील पुरवठा साखळी निरंतर सुरू ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाड़त असून, या आव्हानात्मक काळात आम्ही आमचे कर्तव्य बजावून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी वचनबद्ध असल्याचे जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी नमुद केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून अनेक आव्हानांना सामोरे जात असूनही आम्ही माल हाताळणीमध्ये निरंतर वाढ केली आहे. एप्रिल २०२१ मध्ये, जेएनपीटीने ४६८,०१५ टीईयू माल हाताळणी केली आहे. मागील वर्षी याच कालावधीत हाताळणी केलेल्या २८३,८०२ टीईयूच्या तुलनेत ६४.९१ टक्के अधिक आहे.

## रेवस रेड्डी सागरी महामार्गावरील पूलांचा आराखडा तयार करण्यास मंजूरी

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या दूरदृष्टीचे मोठे यश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी रेवस रेड्डी सागरी महामार्गाच्या उभारणीबाबत दि.१० मे, २०२१ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये या पूलांचा Iconic आराखडा तयार करण्यास मान्यता दिली आहे. पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या कोकणातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने असलेल्या दूरदृष्टीचे हे मोठे यश आहे.

राज्य शासनाने कोकण विभागातील रेवस–रेड्डी हा सागरी महामार्ग विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्त केले आहे. त्यानुसार महामंडळामार्फत सदर सागरी महामार्गाचा



सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून या सागरी महामार्गाच्या आखणीमध्ये प्रामुख्याने १. रेवस ते कारंजा पूल, २. रेवदांडा ते कोर्लई पूल, ३. दिघी ते आगरदांडा पूल, ..../२

## मराठा आरक्षण : मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळाने दिले राज्यपालांना निवेदन

### मराठा आरक्षणप्रश्री लवकरच पंतप्रधानांची भेट घेणार : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मराठा आरक्षण देण्यासंदर्भात मा. राष्ट्रपती व केंद्र शासनाने पावले उचलावीत, यासाठी मा.राष्ट्रपती महोदय व केंद्र शासनाला लिहिलेले पत्र देण्यासाठी शिष्टमंडळासह आज राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. आमच्या भावना केंद्रापर्यंत पोचविण्याची विनंती यावेळी त्यांना केली आहे. तसेच मराठा आरक्षणासंदर्भात लवकरच मा.पंतप्रधान यांची भेट घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज येथे दिली.

राज्य शासनाच्या शिष्टमंडळासमवेत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवन येथे भेट घेतल्यानंतर माध्यम प्रतिनिधींशी मुख्यमंत्री श्री.ठाकरे बोलत होते. या शिष्टमंडळात उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, नगर विकास मंत्री एकनाथ



शिंदे, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, आमदार नाना पटोले यांचा समावेश होता. यावेळी शिष्टमंडळाने राज्यपालांना मराठा आरक्षणासंदर्भात केंद्र सरकारने पाऊले उचलण्याबाबत राष्ट्रपती व केंद्र शासनाला विनंती करणारे पत्र राज्यपाल महोदयांना दिले.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना सांगितले होते की, आरक्षण देण्याचा अधिकार राष्ट्रपती व केंद्र शासनाचा आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने यात लक्ष घालून लवकरात लवकर पाऊले उचलावीत, अशी विनंती करणारे पत्र मा. राष्ट्रपती महोदय व केंद्र शासनाला लिहिले ..../२

# स्वागतार्ह सक्रियता

गेल्या काही दिवसांमध्ये भारतीय न्यायव्यवस्था अतिशय सक्रिय झाली आहे. ही सक्रियता सर्वोच्च न्यायालयापासून बहुतेक राज्यांमधील उच्च न्यायालयांपर्यंत दिसते आहे. ही न्यायालयीन सक्रियता करोनाबाबत आहे. आज सारा देश महासंकटात सापडला असताना माध्यमे आणि न्यायालये या दोन्ही स्तंभांची वाढलेली सक्रियता ही केंद्र तसेच राज्य सरकारांनी स्वागतार्ह मानली पाहिजे आणि तिला अनुकूल प्रतिसाद द्यायला हवा आहे. याचे कारण, माध्यमे किंवा न्यायालयीन सक्रियता हे समाजाच्या अस्वस्थतेचे, वेदनांचे आणि असहायतेचे प्रतिबिंब आहे. गेल्या काही दिवसांतल्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशांकडे नजर टाकली तर, करोनातील जीवरक्षक औषधांची किंमत, पेटंटच्या जागतिक कायद्यांमुळे होणारी कोंडी, प्राणवायूचा देशातील पुरवठा आणि आता शेवटी केंद्र सरकारचे एकंदरीतच करोना धोरण हे सर्व विषय सर्वोच्च न्यायालयाने हाताळले आहेत. केरळमध्ये विजयन यांच्या सरकारने पुन्हा सत्तारूढ झाल्यानंतर लगेच 'कोणत्याही रुग्णालयात करोना रुग्णांचे दैनंदिन बिल तीन हजारांच्या वर होता कामा नये' असे फर्मान काढले. केरळ उच्च न्यायालयाने 'उत्तम निर्णय' अशा शब्दांत त्याचे स्वागत करून या निर्णयामागे न्यायिक ताकद उभी केली. याशिवाय, आता 'यूथ बार असोसिएशन' सुप्रीम कोर्टात नवी याचिका घेऊन गेली आहे. 'समाजातील वंचित, अपंग आणि वृद्धांना आपल्या घरी लस मिळण्याचा अधिकार आहे आणि लसीकरण तसे करावे' अशी मागणी या तरुण वकिलांनी केली आहे. समाजातील मोठा वर्ग ऑनलाइन नोंदणी करू शकत नाही, हा या याचिकेमागचा मुख्य युक्तिवाद आहे. सुप्रीम कोर्ट या याचिकेची योग्य ती दखल घेईलच. मात्र, त्या आधी एकंदरीतच करोना धोरण ठरविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्वत:हून कारवाई सुरू केली आहे. रविवारी उशिरापर्यंत याबाबत सुनावणी झाली. सोमवारी याचा निकाल अपेक्षित होता. मात्र, सुनावणी करताना दूरदृश्यप्रणालीत काहीतरी गडबड झाल्याने न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. एल. राजेश्वर राव आणि न्या. एस. रवींद्र भट यांच्या खंडपीठाने ही सुनावणी गुरुवारपर्यंत पुढे ढकलली आहे. करोनाच्या लढाईचे व्यापक धोरण ठरविण्यासाठी सुप्रीम कोर्टाने पुढाकार घेऊ नये आणि हे काम केंद्र सरकारकडेच राहू द्यावे, अशी बाजू सरकारी वकिलांनी मांडली आहे. केंद्र सरकारने खंडपीठासमोर याबाबत एक प्रतिज्ञापत्रही सादर केले आहे. 'राज्य घटनेच्या १४ आणि २१ या कलमांनी नागरिकांना जो आरोग्याचा मूलभूत हक्क प्रदान केला आहे; त्या हक्कांना अनुसरून तुम्ही लसीकरणाचे धोरण ठरविले आहे काय?' असा मूलभूत प्रश्न खंडपीठाने केंद्र सरकारला विचारला होता. असे निष्पक्ष आणि सर्वांना समान न्याय देणारे धोरण तुम्हाला आखता येत नसेल तर ते काम आम्ही करू, असे सुप्रीम कोर्टाच्या या निरीक्षणात अनुस्यूत होते. त्याला केंद्र सरकारने आता विरोध केला आहे. 'व्यापक धोरणासाठी सूचना व मार्गदर्शन द्या. मात्र, सरकार, प्रशासन, नोकरशाही यांनाच धोरण निर्धारण आणि अंमलबजावणीचे काम करू देत, (ते काम न्यायपालिकेने करण्याची आवश्यकत नाही)' असे केंद्र सरकारने या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. न्यायालयात केंद्र सरकारला असे म्हणणे भागच आहे. मात्र, न्यायसंस्थेवर इतके सक्रिय होण्याची वेळ का आली, याचे आत्मपरीक्षण केंद्र तसेच इतरही सगळ्या राज्य सरकारांनी करण्याची गरज आहे. आज महाराष्ट्रातील ग्रामीण किंवा अर्ध-नागरी भागांमध्ये लसीकरण, करोना रुग्णांवरील उपचार आणि अत्यावश्यक इंजेक्शनचा पुरवठा याबाबत हाहाकार माजला आहे. इंजेक्शन किंवा लसीकरणासाठी नागरिकांना लुटले व नागवले जात आहे. मुंबईत बरी व्यवस्था झाली, याचा अर्थ राज्यात आलबेल आहे, असे नाही. मात्र, राज्याचे प्रशासन व आरोग्य व्यवस्था पारदर्शक पद्धतीने तळागाळापर्यंत काम करताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवरच न्यायसंस्थेला यात लक्ष घालावे लागत आहे. प्राणवायूच्या पुरवठ्याबाबतही गोंधळाचे वातावरण असल्यामुळे सुप्रीम कोर्टाने अखेर १२ तज्ज्ञांचा 'राष्ट्रीय कार्यगट' नेमला. हा गटाच्या उपसमित्याही तयार होतील. हा गट आता देशातील प्राणवायू पुरवठ्याचे काम पाहील. ही केंद्र तसेच राज्यांच्या आरोग्य खात्यांना बसलेली चपराक आहे, एवढेतरी भान सत्ताधाऱ्यांना आहे का? याच कार्यगटाला सर्वोच्च न्यायालयाने औषधांच्या पुरवठ्याकडे लक्ष देण्याची विनंती केली आहे. प्राणवायूच्या पुरवठ्याचे नवे नियम हा कार्यगट लवकरच बनवेल. पंतप्रधान मोदी म्हणाले त्याप्रमाणे असे संकट शतकातून एकदाच येते. मात्र, आरोग्य व्यवस्था उत्तम असेल तर अशा संकटाचा घाव थोडा सुसह्य होतो. सर्वोच्च न्यायालयाने हे काम हाती घेतलेच आहे तर त्याने देशातील आरोग्य व्यवस्थेचा सखोल आढावा घ्यावा आणि केंद्र व राज्य सरकारांना करोनोत्तर काळात अमलात आणण्यासाठी एक व्यापक आरोग्य आराखडा बनवून द्यावा. न्यायालयांनी सांगितल्याशिवाय समजूच नये, हे सरकार व नोकरशाहीचे घोर अपयश आहे. करोना काळात ते वारंवार दिसते आहे.

# कोरोनाचा वाढता पादुर्भाव रायगडात काही दिवस कडक लॉकडाऊन करण्याची गरज

## बाजारपेठेतील विनाकारण गर्दी धोकादायक

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोरोना महामारीच्या काळात शासनाकडून कितीही उपाय योजना केल्या तरी रायगड जिल्ह्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत दिवसंदिवस प्रचंड प्रमाणात वाढ होतांना दिसत आहेत.याचे कारण रायगड जिल्ह्यातील प्रत्येक बाजारपेठेत समान सुमान भाजीपाला खरेदीसाठी होणारी नागरिकांची गर्दी धोकादायक ठरत असून स्वतःच्या जीवाची पर्वा नसल्याचे दिसून येत असल्याचे सर्वत्रच चित्र पहावयास मिळत आहे.

कोरोनाचा वाढता पादुर्भाव रोखण्यासाठी अनेक नागरिकांसाठी देशात व राज्यात तसेच जिल्ह्यातील तालुका स्तरावर अनेक उपाय योजना केल्या जात आहेत त्याला नागरिकांकडून केराची टोपली दाखवत असल्याचे चित्र या गर्दीमुळे सर्वत्रच पहावयास मिळत आहे.संपूर्ण देशासह व राज्यात दुसऱ्या कोरोना लाटेचा पादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात १५-१५ दिवसाचे विकेंड लॉकडाऊन जाहीर केले आहे त्यातच गर्दी टाळण्याचे आव्हान देखील सर्व स्तरावरील प्रशासकीय यंत्रणेकडून केले आहे.परंतु हे आव्हान नागरिक स्वतःहून पायधुळी पाडत संसर्ग अंगावर ओढावून घेत असल्याचे नाकारता येत नाही.



सध्या जिल्ह्यात कोरोना संसर्गाची रुग्ण संख्येत होत असलेली प्रचंड वाढ त्या पाठोपाठ मृतांचा वाढता आकडा रोखण्यासाठी काही त्या त्या स्तरावर बाजारपेठा पूर्णपणे बंद ठेवल्या आहेत तर काही बाजारपेठा आठ दिवस कडकडीत बंद केलेल्या आहेत.यामुळे बंद केलेले परिसरातील नागरिक सुरु असलेल्या बाजारपेठेत एकच गर्दी करुन सोशल डिस्टनचा फजा उडवीत आहेत.तसेच काही ठिकाणी विविध क्षेत्रातील व्यवसाय सकाळी ७ ते ११ पर्यंत सुरु तर काही ठिकाणी दुकाने बंद यामुळे काही व्यवसायिकावर अन्याय होत असल्याचे व्यवसायिकांकडून बोलले जात आहे.

तसेच कोरोना रोखण्यासाठी उपचार दरम्यान निघालेली लस काही ठिकाणी पाहिली लस दिलेली महिना उलटून गेला तरी दुसरी लस उपलब्ध होत नसल्याने नागरिक दुसऱ्या डोसच्या प्रतीक्षेत आहेत . तर काही ठिकाणी पहिलीच लस देखील वेळेवर उपलब्ध होत नाही.यामुळे कोरोना संसर्ग रुग्णांची संख्या वाढत असुन ही अनेक ठिकाणी बाजारपेठेत वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिक प्रचंड गर्दी करीत आहेत.तर काही नागरिक कोणतेही काम नसतांना विनाकारण बाहेर पडून गर्दी करुन सोशल डिस्टनचे उलंघन करीत आहेत.त्यामुळे चार दिवस एक बाजारपेठ उघडी चार दिवसांनी ती बंद,दुसरी बाजारपेठ सुरु असे करण्यापेक्षा कोरोना रुग्णांच्या संख्येला आला घालण्यासाठी संपूर्ण रायगडात आठ दिवस लॉक डाऊन बंद करा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# उरण पिरवाड समुद्र किनाऱ्यावर शुकशुकाट

**दै.रायगड नगरी । उरण**



कोरोना संकटामुळे राज्यात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. या काळात समुद्रकिनाऱ्यावर फिरण्यास मनाई असल्याने पर्यटकांविना उरण पिरवाड समुद्र किनाराही ओस पडला आहे. सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

लॉकडाऊनमध्ये सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत फक्त किराणा, भाजीपाला, चिकन, मटण, मच्छी इत्यादी जीवनावश्यक व्यवसाय, सुरू ठेवण्यास परवानगी आहे. त्यामुळे एसटीच्या उरण आगाराने फक्त अत्यावश्यक सेवा वितरिक्त बाकी सर्व बस फेऱ्या बंद ठेवल्या आहेत. लॉकडाऊनमध्ये समुद्रकिनाऱ्यावर फिरण्यास मनाई असल्यामुळे उरण -पिरवाड समुद्र किनाऱ्यावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या खाद्य पदार्थाच्या टपऱ्या, दुकाने .हातगाडी वाले, कणीसवाले, चायनीज मांसाहार, भाकरी, शहाळे ,आदी दुकाने बंद असल्याने स्थानिकांचा उत्पनांचे साधन बंद झाले त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे समुद्र किनाऱ्यावर सुमारे १५ दुकाने आहेत. उरण बस डेपो मोरा ते पिरवाड समुद्र किनारी जाणारे रिक्षावाले यांचा धंदा बंद झाला असे व्यवसाईक यांचा धंदा बंद झाला.

रण तालुकाग्तील निसर्गाच्या सानिध्यात असलेले माणकेश्वर मंदिर ,विनायक गावातील रिद्धी -सिद्धी गणपती मंदिर, करंजा येथील देवीचे मंदिर, घारा-पुरी बेट,आदी पर्यटन स्थळाला पर्यटक येत नाहीत त्यामुळे येथील स्थानिकांना मिळणारे उत्पन्न बंद झाले त्या मुळे येथील स्थानिकांना उपासमारीची वेळ आली आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या झपाट्याने वाढू लागल्याने राज्यात कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्याचा फटका उरण तालुक्यातील पर्यटन व्यावसायिकांना बसला आहे. मागील वर्षी तब्बल नऊ महिने हॉटेल, लॉज इत्यादी व्यवसाय पूर्णपणे बंद होते. आता मार्च महिन्यापासूनच पर्यटन व्यवसाय पूर्णपणे बंद झाले आहेत. त्यामुळे पर्यटन व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. पर्यटक या ठिकाणी येत नसल्यामुळे व्यवसाय नुकसानीत असल्याचे पाहायला मिळत आहे. पर्यटन व्यवसाय ठप्प झाल्यामुळे त्यावर अवलंबून असणारे कामगारदेखील बेकार झाले आहेत.

# म्हसळा ग्रामिण रुग्णालयास सुर्योदया फाऊंडेशनतर्फे ऑक्सिजन मशीन, रुग्णांची झाली सोय

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सुप्रसिद्ध गायिका पद्मश्री डॉ.अनुराधा पौडवाल यांच्या सुर्योदया फाउंडेशन मार्फत व रायगड भूषण कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नाने रायगड जिल्ह्यातील पाच शासकीय रुग्णालय मध्ये ऑँक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन आरोग्य यंत्रणेला देऊनसामाजिक दायित्वनिभावले. आपदग्रस्तकाळात शासनाच्या मदतीला नेहमी सामाजिक बांधिलकी जपत हे संस्था मदतीचा हात पुढे करीत असते. मग शैक्षणिक, सामाजिक कार्यात सदैव पुढे असते.



निसर्ग चक्रीवादळात अनेक घरांची पडझड, शाळा कॉलेज, याचे छप्पर उडालेअसतानाच मदतीचा हात पुढे केला तर कधी पाणी टंचाईग्रस्त गावाला पाण्याची सोय उपलब्ध करूनदिली आहे.याचाच एकभाग म्हणून सद्यपरिस्थितीत आपदग्रस्त कोरोना काळात रूग्ण संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून प्राणवायूची कमतरता पडत असल्याचे लक्षात घेऊन सुर्योदयाफांऊंडेशनच्या सर्वेसर्वा डॉ. अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते घाटकोपर देण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील१) माणगांव शासकीय रुग्णालय कोविड सेंटर- २ ऑक्सिजन मशीन २) श्रीवर्धन शासकीय रूग्णालय कोविड-२ ऑक्सिजन मशीन ३) लोणेरे शासकीय कोविड सेंन्टर - २ऑक्सिजन मशीन ४) तळा ग्रामीण रुग्णालय -१ ऑक्सिजनमशीन ५) म्हसळा शासकीय ग्रामीण रुग्णालय -१ ऑक्सिजन मशीन ६) जे जे रुग्णालय मुंबई -३ ऑक्सिजन मशीन अशी ११ ऑँक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन डोनेटकरण्यात आली. त्यावेळी रायगड भूषणतथा नाना पालकर स्मृती प्रतिष्ठानचे व्यवस्थापक कृष्णा महाडिक, जे जे रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. संजय सुरासे, रायगड जिल्हा परिषद कृषी सभापती बबन मनवे, श्रीवर्धन शासकीय रुग्णालयाचे अधिक्षक डॉ मधुकर ढवळे, माणगाव शासकीय रुग्णालयाचे अधिकारी डॉ प्रदीप इंगोले, म्हसळा शासकीय रुग्णालयाचे डॉ. महेश मेहता सामाजिक कार्यकर्ते सतिश शिगवण आदि मान्यवर उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पूलांचा आराखडा तयार करण्यास मंजूरी

४.बाणकोट खाडी पूल, ५. साक्षी व केळशी पूल, ६. दाभोळ ते वेलदूर पूल, ८. साक्षी ते पाथर पूल, ८. कुणकेश्वर पूल, ९. वरवडे येथील पूल, १०. कोलम खाडीवरील पूल या पूलांचा समावेश आहे.

या पुलांची आखणी व आराखडा निश्चित करताना पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या सूचनेनुसार कोकण संस्कृती, पर्यटन, सामाजिक जीवन, परंपरा इ. बाबी विचारात घेतल्या जाणार असून त्यामध्ये कोकणाचे वैभव प्रतिकात्मक (Iconic) स्वरुपात दर्शविल्यास, कोकण पर्यटनास चांगल्या प्रकारे चालना मिळू शकणार आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

यानुषंगाने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना महामार्गावरील प्रामुख्याने १. रेवस ते कारंजा पूल, २. दिघी ते आगरदांडा पूल व ३. बाणकोट खाडी पूल या पूलांसह उर्वरित पूलांसाठी खलेपळल आखणी व आराखडा तयार करावा आणि त्याप्रमाणे प्रकल्प विकास आराखड्यामध्ये समावेश करावा, असे लेखी कळविले आहे.

## शिष्टमंडळाने दिले राज्यपालांना निवेदन

आहे. आपल्यामार्फत हे पत्र मा.राष्ट्रपती व केंद्र शासनाकडे पाठवावे, अशी विनंती राज्यपाल श्री. कोश्यारी यांना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर समाजाच्या भावना लक्षात घेऊन केंद्र शासनाला याबाबत विनंती करायचे ठरविले आणि त्यानुसार आज राज्यपालांना भेटून पहिले पाऊल टाकले आहे. आमचे म्हणणे ऐकून यासंदर्भात केंद्र शासनाकडे राज्यपाल महोदय कळवतील.

मराठा आरक्षणाचा कायदा विधिमंडळात सर्व पक्षांनी एकमुखाने संमत केला आहे, जनतेच्या भावनांचा आदर ठेवून हा निर्णय झाला, तो न्यायालयात टिकला नसला तरी सरकार म्हणून आम्ही सर्व या समाजाच्या भावनांशी सहमत आहोत. मराठा समाजाने नेहमीच समजूतदारपणा दाखवला आहे. आरक्षण प्रश्नी सरकार त्यांच्यासोबत आहे, याची समाजाला कल्पना आहे, ते सरकारच्या विरोधात नाहीत. त्यामुळे मी पूर्वी देखील मराठा समाजाला धन्यवाद दिले आहेत आणि आता आपल्या माध्यमातून परत धन्यवाद देतो, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मराठा समाजाला आरक्षणाचा न्याय हक्क मिळाला पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. आरक्षणाचा हा प्रश्न फक्त एका राज्याचा विषय नाही. तर देशातील अनेक राज्यांचा प्रश्न आहे. राज्यांचा अधिकार अबाधित राहावेत, यासाठीही केंद्र शासनाकडे पाठपुरावा करू, असेही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

पत्रकार परिषदेपूर्वी राज्यपाल श्री. कोश्यारी यांना शिष्टमंडळाने निवेदनाचे पत्र दिले. यावेळी मराठा आरक्षण विषयक उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी मराठा आरक्षणप्रश्नी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आणि त्या अनुषंगाने राज्यपाल महोदयांना माहिती दिली. यावेळी श्री.चव्हाण म्हणाले की, सर्व पक्षाने सहमतीने मराठा आरक्षणाचा कायदा केला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय मागास आयोगाचा व राष्ट्रपती महोदयांचा अधिकार असल्याचे निकालात नमूद केले आहे. त्यामुळे राज्याचे पालक म्हणून राज्यपाल महोदयांनी केंद्र शासनाकडे तसेच मा.राष्ट्रपती महोदयांकडे या प्रश्नी राज्याची बाजू मांडावी. याप्रश्नी राज्यपाल महोदयांची भूमिका महत्त्वाची असून मराठा समाजाला न्याय मिळवून द्यावा.

# पनवेल महापालिका हद्दीतील वकीलांना कोव्हिड लसीकरणासाठी प्राधान्य द्या : ॲड.मनोज भुजबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका हद्दीतील वकील, त्यांचे कुटुंबीय व त्यांचे कर्मचारी यांना कोव्हिड लसीकरणासाठी प्राधान्य देण्याची मागणी बार असोसिएशनचे अध्यक्ष व भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी आयुक्त सुधाकर देशमुख यांना पत्र देऊन केली आहे.



देशात कोव्हिड - १९ ची दुसरी लाट आली असल्याने केंद्र व राज्य सरकारने कोव्हिड -१९ लसीकरण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. पनवेल मध्ये जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आहे. येथे मोठ्या प्रमाणात वकिल, त्यांचे कर्मचारी व आशिलांचा वावर असतो. पनवेल वकील संघटनेचे जवळपास एक हजार सदस्य आहेत. सर्व महापालिका आयुक्तांना त्यांच्या हद्दीत येणाऱ्या सर्व न्यायिक अधिकारी, वकील व कर्मचाऱ्यांना लसीकरण प्रक्रिया पूर्ण करण्या बाबत आदेश पारित केले आहेत.

मुंबई महापालिकेने वकिलांना, त्यांच्या कुटुंबीयांना व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र दाखवून लसीकरण करण्यास प्राधान्य दिले आहे. त्याच प्रमाणे पनवेल महापालिकेने पनवेल महापालिका हद्दीत राहणाऱ्या व ग्रामीण भागात राहणाऱ्या अथवा कार्यालय असणाऱ्या वकिलांना, त्यांच्या कुटुंबीयांना व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र दाखवून लसीकरण करण्यास प्राधान्य देण्याची मागणी ॲड मनोज भुजबळ यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# श्रीवर्धन नगरपरिषदेच्या हद्दीतील विकासकामांसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन नगरपालिकेच्या हद्दीतील विठ्ठल आळी येथे विहीर बांधणे व श्रीवर्धन नगरपरिषदेकडील शाळा क्र. १ च्या हॉलमध्ये डिजिटल अभ्यासिका सुरू करणे, या कामांना नुकतीच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या पाठपुराव्याद्वारे श्रीवर्धन नगरपरिषदेस वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत एक कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले असून येथील विठ्ठल आळी येथे विहीर बांधणे, या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४ लाख ९१ हजार ४४१ तर नगरपरिषद शाळा क्र. १ च्या हॉलमध्ये डिजिटल अभ्यासिकेसाठी रु.६८ लाख ५६ हजार ७९५ असे मिळून एकूण ७३ लाख ४८ हजार ५१९ इतक्या रकमेचे जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या स्वाक्षरीचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

# रावे गावची यात्रा शांततेत पार

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील रावे गावात सालाबादाप्रमाणे चैत्र अमावस्येला आई रायबादेवीची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाचे नियम पाळून रावे ग्रामस्थांनी यात्रा साजरी न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे यावर्षी पारंपरिक येलकोटीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला नाही.



मिठाई तसेच इतर कोणतीही दुकाने नसल्याने सगळीकडे शुकशुकाट दिसून येत होता. त्यातच ग्रामदेवतेचे मंदिर दर्शनासाठी बंद असल्याने भाविकांनी सोशल डीस्टनचे नियम पाळून आई रायबादेवीचे मुखदर्शन घेतले. यावेळी पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आला होता. यामध्ये वडखळ आर.सी.पी.च्या दोन तुकड्यासह २ पोलिस अधिकारी तसेच १० पोलिस कर्मचारी बंदोबस्तास होते. यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून सहाय्यक पोलिस निरीक्षक जी. डी. पाटील, पोलिस सब इन्स्पेक्टर के. आर.भौड विशेष लक्ष देऊन असल्याचे दिसून आले.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## लायन्स क्लब पनवेलतर्फे मास्कचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे पनवेल परिसरातील नागरिकांसाठी गरजवंतांसाठी मोफत मास्कचे वाटप करण्यात आले.

या मोहिमेंतर्गत अडीच हजाराहून जास्त नागरिकांना मास्कचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे या सर्व उपक्रमाचा खर्च पनवेल लायन्स क्लबच्या अध्यक्षा ला.भावना जेसवानी यांच्या तर्फे करण्यात आला. या उपक्रमाला रिजन सात चे चेअरमन ला.संजय गोडसे, रिजन सचिव ला.सुयोग पेंडसे, ला.अशोक गिल्डा यांनी भेट देवून समाधान व्यक्त केले आहे. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी ला.भावना जेसवानी, ला.राजेंद्र जेसवानी यांना पनवेल क्लबच्या सर्व लायन सभासदांचे सहकार्य लाभले आहे.

## मजूरांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या जागतिक संकटामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे प्रतिबंध म्हणून संपूर्ण देशात लोक डाऊन हा पर्याय निवडला आहे. त्यामुळे व्यवसाय ठप्प पडले आहे रोज मजुरी करणारे कुटुंब विस्कळीत कुटुंब यांच्यावरती उपासमारीची वेळ आली आहे. याच पार्श्वभूमीवर के न फाउंडेशन आणि त्यांचे संस्थापक कोमल सुरज खोचरे उर्फ (तावरे ) यांनी काही गरजूंना अन्नधान्य किट आणि जीवनावश्यक वस्तू यांचे वाटप केले. कोरोना वर विजय मिळवून सगळे घरी सुरक्षित राहू अशा संदेश आणि जनजागृती करण्यात आली तसेच के एन फाउंडेशन आणि त्यांची टीम राजेंद्र तावरे, उझेफ शेख ,संदीप वर्मा पुष्पा काळे ,सतीश पवार सचिन गोरे,अक्षता बेलनकर उर्मिला वर्मा ,किरण तावरे,सोमनाथ तावरे,योगेश खुजे या सर्वांनी खूप मोलाची साथ दिली तसेच ए के फाउंडेशन संस्था आणि त्यांचे संस्थापक अंकुश कांबळे यांनीही त्यांच्याप्रमाणे हातभार लावला, संजय सावंत हरीश कांबळे, मनीष कांबळे ,सूर्यकांत कांबळे ,योगेश केणी सुभाष सोनवणे , सोहील नाईक ,प्रणय जाधव ह्यांचा साहाय्याने जीवन आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले केएन फाऊंडेशन आणि त्यांचा संस्थपिका कोमल सुरज खोचरे (तावरे) आशा च गरजू लोकांसाठी काम करतील आणि त्यांना आधार देतील ,त्यांचा ह्या कार्याला करू तितके कौतुक कमी आहे ,ह्या काळात सुद्धा स्वतः बारकाईने लक्ष्य देऊन लोकांना मदत करतायत.एक हात मदतीचा, लोक सेवा हीच ईश्वर सेवा मानून ते आज जनतेची सेवा करीत आहेत.

# ६५ गावांना दुष्काळग्रस्त गावे जाहिर करून टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**




रायगड जिल्ह्यातील अनेक गावांना सध्या भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे, काही ठिकाणी धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्तिती दिसून येत आहे. उमटे धरणातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे? उमटे धरण हे मागील सन २०१६-१७ पासून उमटे धरणाचा गाळ काढून धरणाच्या संरक्षण भिंतीची भगदाडे भरावीत यासाठी आम्ही शासनाला विनंती अर्ज दिले. मात्र शासनाने नकारात्मकतेची भूमिका घेवून धरणाचा गाळ न काढता लोकांच्या भावनेची चेष्टाच केली आहे. याबाबतीत ॲड. राकेश पाटील यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना मागणीचे निवेदन दिले, सदर निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, आमदार महेंद्र दळवी, पालकमंत्री तटकरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील, शेकाप नेत्या चित्र-लेखा पाटील तसेच मुख्य कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग रायगड जिल्हा परिषद यांना देण्यात आल्या आहेत.

सध्या उमटे धरणाच्या पाण्यावर धरणा लगतची ६५ गावे अवलंबून आहेत. उमटे धरण हे रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येते. मात्र स्थानिक घाणेरडया राजकारणाबरोबरच अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे धरणात मागील ४० ते ४५ वर्षांपासून गाळ तसाच साचलेला आहे. उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या येथील तरूणाईने दिनांक १ मे २०१९ रोजी महाराष्ट्र दिनी धरणाचा गाळ काढण्याच्या संदर्भात श्रमदान करून शासनाचा निषेधही नोंदविला. तरूणाईच्या पाण्यासाठीच्या आक्रमक आंदोलनाचा धसका जिल्हापरिषद पाणी पुरवठा विभागाने घेवून धरणाचा गाळ दि. १५ मे २०१९ रोजी काढणार असल्याचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा संजय वेंगुर्लेकर यांनी प्रसिध्द माध्यमाद्वारे जाहिर केले. दि. १५ मे २०१९ उलटून गेल्यानंतर आम्ही श्री. वेंगुर्लेकर यांची कार्यालयात भेट घेतली असता २ दिवसांचा अवधी आमच्याकडे मागीतला होता. त्यानंतर गाळ काढण्यासाठी जे.एस.डब्ल्यू. या खाजगी कंपनीची मदत घेण्याचा निर्णय दस्तुरखुद्द माजी जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला असून तात्काळ कामास सुरूवात करण्याचे प्रसिद्धी माध्यमांद्वारे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी जाहिर केले. मात्र आजपावेतो शासनाने घेतलेले निर्णय धुळखात पडत असून गाळ तसाच साचलेला आहे हे दुर्दैव आहे.

उमटे धरणाचा गाळ यावर्षी तरी आपण युद्धपातळीवर काढाल ही आशा बाळगतो. परंतू सद्य स्थितीत आपण उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या ६५ गावांना दुष्काळग्रस्त गावेफफ म्हणून जाहीर करून येथील गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा ही विनंती. किमान कोरोनाच्या महामारीमध्ये लोकांचा पाण्यासाठीचा जीवघेणा संघर्ष टाळावा, पाण्यासाठी कोरोनाच्या महामारीत आंदोलन करावे की, उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे. हा प्रश्न आमच्यासमोर आ वासून उभा आहे. धरणाच्या वरच्या मथळ्यावर मागील ४ ते ५ वर्षांपासूनची करंज, साग, उंबर, उक्षी तसेच इतर रानटी झाडांची झुडपे मोठ्या प्रमाणात आहेत. सदरची झाडे वादळामध्ये उन्मळुन पडल्यास धरणाच्या वरच्या मथळ्याचे खुप मोठे नुकसान होणार आहे. आपण व्यक्तीशः उमटे धरणावर भेट देवून धरणाच्या दयनीय अवस्थेची आपण पाहणी करुन तात्काळ कारवाई करावी. केलेल्या कारवाईची माहिती देणेची मागणी पाटील यांनी केली आहे.

## रोहा-कोलाड मार्ग सुसाट बनणार ; कारपेट रस्त्याचे काम पुर्णत्वाचे मार्गावर



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

बहुचर्चेत असलेल्या रोहा-कोलाड या राज्य महामार्गाचे कारपेट रस्त्याचे काम पुर्णत्वाचे मार्गावर आल्याने प्रवासीवर्ग व वाहनचालकांना चांगलाच दिलासा प्राप्त झाला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याचे कामाचे फक्त खड्डे बुझविण्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे काम केले नसल्याने या मार्गावरील खड्ड्यांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली होती. तर पावसाळ्यात या मार्गावर प्रवास करणे म्हणजे जीव-ावर बेतल्यासारखेच असायचे. मार्गाचे दुरावस्थेमुळे आतापर्यंत विविध छोटे मोठे अपघाताचे प्रसंगही घडले आहेत. तर या मार्गावरील वाहतुकीचा विचार करता खराब मार्गामुळे प्रवास करणे मोठे जिकरीचे असायचे. तर गत पावसाळ्यात या मार्गाची दुरावस्था पाहता तसेच प्रवासीवर्ग व वाहनचालकांना होणा-या त्रासाचा विचार करता स्थानिक खासदार, आमदार व अन्य लोकप्रतिनिधी तसेच प्रांताधिकारी व तहसिलदार व संबंधित विभागाचे अधिकारी वर्ग यांना तालुक्यातील विविध संघटनांनी वेळोवेळी लक्ष वेधित करून अखेर दिपावलीनंतर खड्डे बुझविण्याचे काम पुर्ण करण्यात आले होते.

खड्डे बुझवून सहा महिने पुर्ण होऊन व पावसाळा ऋतू तोंडावर येऊन देखील या वर्षीही खड्ड्यातूनच प्रवास करावा लागतोय की काय ? अशाप्रकारची भिती वाटत असतानाच अखेर या मार्गावर कारपेट टाकण्याचे काम सुरू करून व सद्यस्थितीत या मार्गाचे कारपेटचे काम पुर्णत्वाचे मार्गावर असून लवकरच पुर्ण होईल असे दिसत असल्याने सर्वांना दिलासा प्राप्त झाला आहे. या मार्गावरील कारपेटमुळे आता प्रवासी वर्ग व वाहनचालकांचा विनासायास प्रवास तर होणार आहेच याशिवाय वेळ, इंधन व आर्थिकही बचत होणार आहे.

## तोतया पोलिसांनी चक्की चालकाला लुबाडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका तोतया पोलिसांनी चक्की चालकाला ३० हजार रुपयाला लुबाडल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे.


या घटनेतील तक्रारदार बालगोपाल पाल (२१) हा तरुण कळंबोली सेक्टर-३ मधील साई कृपा फ्लोर मिल या दुकानात पिठाची चक्की चालवत असून तो त्याच ठिकाणी राहाण्यास आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने लॉकडाऊन घोषीत केल्यामुळे बालगोपाल हा सकाळी ७ ते ११ या वेळेतच चक्की चालु ठेवतो. बालगोपाल हा नेहमीप्रमाणे पहाटे ४ वाजता उठून आपली तयारी करत होता. त्यानंतर तो आपल्या दुकानाचे शटर अर्धवट उघडे ठेवून चक्कीच्या खराब झालेल्या दगडांच्या दुरुस्तीचे काम करत होता. यादरम्यान, सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास त्याठिकाणी काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरुन हेल्मेट घालुन साध्या कपडयावर आलेल्या एका तोतया पोलिसांने, बालगोपाल याला इतक्या सकाळी चक्की चालु ठेवण्याचे कारण विचारुन त्याला दरडावले.

यावर बालगोपाल याने दुरुस्तीचे काम करत असल्याचे सांगितल्यानंतर तोतया पोलिसांने त्याच्याकडे आधारकार्डची मागणी करत चक्कीमध्ये प्रवेश करुन ३० हजार रुपये दंड भरावा लागेल असे त्याला सांगितले. त्यानंतर त्याने चक्कीच्या गल्लयामध्ये असलेली ३० हजार रुपयांची रक्कम स्वत:कडे घेऊन बालगोपाल याला दुकान बंद करुन सोबत पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले. त्यानंतर तोतया पोलिसाने बालगोपाल याला आपल्या मोटारसायकलवरुन कळंबोली सेक्टर-४ ई मधील शिवभोजन दुकानापर्यंत नेऊन त्याला खाली उतरवून पोलीस स्टेशनला येण्यास सांगून त्याठिकाणावरुन त्याने पलायन केले. त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात गेलेल्या बालगोपालने तोतया पोलिसांची बराचवेळ वाट पाहिली, मात्र तो त्याठिकाणी न आल्याने त्याने पोलीस ठाण्यात जाऊन त्याच्याबाबत चौकशी केल्यानंतर सदरचा पोलीस हा तोतया पोलीस असल्याचे त्याला समजले. त्यानंतर त्याने तोतया पोलिसाविरोधात तक्रार दाखल केली.

## पालीतील मूकबधिर चित्रकार चेतन पाशिलकरने राष्ट्रीय ऑनलाईन व थायलंड आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत पटकावले द्वितीय क्रमांक

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील मूकबधिर चित्रकार चेतन पाशिलकरने महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. नुकत्याच झालेल्या चौथ्या राष्ट्रीय ऑनलाईन चित्रकला स्पर्धेत व थायलंड येथील आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत त्याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.



चेतन यांनी चौथ्या राष्ट्रीय ऑनलाईन चित्रकला स्पर्धेत काढलेल्या श्राद्ध विधी पितृ या बहारदार चित्राला द्वितीय क्रमांक मिळाला आहे. याबद्दल रोख रक्कम ४५००० आणि प्रमाणपत्र मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी चेतनला थायलंड येथील आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत देखील द्वितीय क्रमांक मिळाला होता. तर ुहे ने घेतलेल्या आंतराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला होता. चेतनच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

पाली जवळील तळई हे चेतनचे मूळ गाव आहे. तो जेजे स्कुल ऑफ आर्टस् कॉलेजमधून मास्टर ऑफ फाईन आर्ट्स मध्ये गोल्ड मेडल मिळविले आहे. त्याने या आधी देखील अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविले आहेत. सध्या तो पालीतील विविध भिंती बोलक्या करण्याचे काम करत आहे. या भिंतींवर त्याने अतिशय आकर्षक व मनमोहक चित्रे रेखाटली आहेत.

## श्रीवर्धन तालुक्यात पुन्हा एकदा कोरोना रुग्णांची उसळी ; मागील दोन दिवसात २७ नवीन रुग्ण

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील १० ते १२ दिवसांमध्ये कोरोना रुग्ण आढळण्याचे प्रमाण बरेच कमी झाले होते. दिवसाला तीन ते चार कोरोना बाधित रुग्ण आढळून येत होते. परंतु दिनांक १० मे रोजी एकाच दिवशी १६ कोरोना रुग्ण श्रीवर्धन तालुक्यात आढळून आले. यामध्ये श्रीवर्धन शहरातील एकाच कुटुंबातील व्यक्ती कोरोना बाधित असल्याचे समोर आले आहे. आज देखील नवीन ११ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले. यामध्ये श्रीवर्धन शहरात रुग्णांची संख्या कमी आहे. मात्र सर्वात जास्त रुग्णांची संख्या बोर्लिपंचतन येथील आहे.

सध्या उपचार घेणाऱ्या रुग्णानी शतक गाठले असून १०२ जण कोरोना वरती उपचार घेत आहेत. यामधील ७० टक्के रुग्ण आपापल्या घरीच विलगीकरणामध्ये उपचार घेत आहेत. श्रीवर्धन मध्ये सकाळी सात ते अकरा या वेळेत बाजारपेठ उघडी असते. त्यावेळी प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी बाजारपेठेत झालेली पाहायला मिळते. दुचाकीस्वारांनी वेडीवाकडी उभी करून ठेवलेली दुचाकी वाहने, त्यामुळे वाहतूक कोंडी देखील मोठ्या प्रमाणामध्ये होते. श्रीवर्धन तालुक्यात आज ११ कोरोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. आतापर्यंत तालुक्यानत एकूण ७६६ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले. ३४ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे, तर ६३० रुग्ण पूर्णपणे बरे होऊन आपापल्या घरी परतले आहेत. नागरिकांनी विनाकारण फिरणे टाळले नाही तर पुन्हा एकदा श्रीवर्धन तालुक्यामध्ये कोरोना रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येणार आहे. तरी प्रशासनाने विनाकारण फिरणाऱ्यावरती नेहमी प्रमाणेच कारवाई सुरू ठेवावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## डोक्यात दगड मारून ३८ वर्षीय इसमास केले जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मित्रांमध्ये झालेल्या वादातून एका इसमाने दुसऱ्या इसमाच्या डोक्यात मारुन शिवीगाळ केल्याची घटना पनवेलजवळील सुकापूर येथे घडली आहे.

खांदा कॉलनी येथे राहणारा वैभव प्रभाकर घाडगे हे हरीग्राम येथे त्याच्या सासू-सासऱ्यांना आंबे देऊन घरी चालले होते. ते सुकापूर येथे मोबाईल फोनवर बोलत असताना जय उघाडे याने त्यांच्या डोक्यात दगड मारला व शिवीगाळ केली.

यावेळी आरोपीने वैभव घाडगे हा तरुण खन्नाचा मित्र असल्यामुळे व त्या दोघांच्यात वाद झाल्यामुळे वैभव यास मारहाण केली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट नं.३७, हि.नं.३, लागवडीयोग्य क्षेत्र ० हे -०५ आर.१० चौ.मी. अधिक पो.ख.० हे-०० आर. ५० चौ.मी. मिळून एकंदर क्षेत्र ० हे.-०५ आर.६० चौ.मी. आकार रु.० पै.२५ ही संपूर्ण मिळकत १) श्री.पदू चाया काकडे, २) श्री.महादेव चाया काकडे, ३) श्री.ज्ञानेश्वर चाया काकडे, ४) श्रीमती.कृष्णाबाई चाया काकडे, ५) श्रीमती.रामीबाई दिनकर तांबेड सुनंदा, ६) श्रीमती.जनाबाई तुकाराम काकडे, ७) श्री.उमेश तुकाराम काकडे, ८) श्रीमती.ऋतिका विकेश फडके, ९) कुमार आदर्श तुकाराम काकडे आणि १०) कुमार प्रजवळ तुकाराम काकडे यांच्या सामाईक खुद्द मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताबे-कब्जा वहिवाटीतील मिळकत असून ती संपूर्ण मिळकत त्यांच्याकडून आमच्या अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री.पदू चाया काकडे वगैरे यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.१२/०५/२०२१

**सही/-**
**श्री.संदीप रमाकांत जगे, ॲडव्होकेट**
**फ्लॅट नं.०२, जयनगर 'ए' को.ऑप. हौ. सोसा.लि., कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१०२०६, जि.रायगड**
**फोन नं. (०२२) २७४५४५४८**
**मोबाईल नं.०९३२४४५४५४८**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड, तलाठी सजा-महोदर हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/भूमापन क्रं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | भोगवटदार वर्ग-१ |
|---|---|---|---|---|
| **१) अती उल्लाह मोहम्मद मुनोरखान**<br>**२) हादिया शबनम मोहम्मद इरफान खान**<br>**३) अरबाज मोहम्मद इरफान खान**<br>**४) कहकशा मोहम्मद इरफान खान**<br>**५) फरजाना खातून मोहम्मद इरफान खान**<br>**६) मोहम्मद शरीफ मोहम्मद इरफान खान**<br>**७) अफसाना मोहम्मद इरफान खान**<br>**८) रिजवाना मोहम्मद इरफान खान**<br>**९) रतिबुन्नीसा मोहम्मद इरफान खान** | **९१/३** | **०-९०-२०**<br>------------<br>**एकूण ०-९०-२०**<br>**यापैकी ०-६७-७०**<br>**व पो.ख.०-००-८०**<br>------------<br>**असे एकूण ०-६८-५०** | **५-२५**<br><br><br>**३-९४** | |

**गट/भूमापन क्रं.९१/३ या सामाईक क्षेत्रापैकी वर नमूद केलेल्या मालकीच्या हिश्श्याचे क्षेत्र एकूण ०-९०-२० या क्षेत्रापैकी ०-६७-७० (गुंठे) इतके व तसेच पूर्ण पो.खं. ०-००-८० असे एकूण मिळून ०-६८-५० इतके सामाईक क्षेत्र आकार ३-९४.**

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा, दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दि.१२/०५/२०२१
ठिकाण : कळंबोली

**सही/-**
**ॲड.सुनील एन.मोरे**
**ऑफिस नं.३०६०, सी-विंग, बीमा कॉम्प्लेक्स प्रिमायसेस, प्लॉट नं.११९, सेक्टर-के डब्ल्यू सी कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८**
**मो.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मे. टोटल होम्स तर्फे प्रोप्रायटर **१) श्री. एस. बी. कदम** यांनी मुळ जमीन मालक **१) भारती तुकाराम कोळी, २) श्री. राहुल हाडकु कोळी, ३) श्री. रामचंद्र शंकर कोळी, ४) श्री. सावळाराम शंकर कोळी** सर्व राहणार गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील मिळकत मालमत्ता नं. **१) २१५३ (क) क्षेत्रफळ २०० चौ.फु., मालमत्ता नं. २) २१५१ (ड) क्षेत्रफळ २०० चौ.फु., मालमत्ता नं. ३) २१५२ (अ) क्षेत्रफळ २०० चौ.फु., मालमत्ता नं. ४) २१५३ (ड) क्षेत्रफळ २०० चौ.फु. मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड नवी मुंबई** ज्याचे एकूण **क्षेत्रफळ ८००.०० चौ.फु.** आहे. ही जमीन मिळकत विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे.

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती - संदर्भातील विकसनाचा करार हे विकासक आणि मुळ जमीन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे. त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकसनाकरिता हस्तांतरीत करण्याचा त्यांस पूर्ण हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांचे** आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत, असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण करतील. व **१४ दिवसांच्या** मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता विकासक हे सदरहु जमीन मिळकत ही विकसनाकरिता घेण्याच्या दृष्टिने कार्यवाही पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**सही / -**
**मे. टोटल होम्स**
**०९, पहिला मजला, वेल्फेअर चेंबर, प्लॉट नं. ७३, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई-४००७०३**
**मोबाईल नं.९५९४७९९०९९**

# संक्षिप्त...

## गुन्हे शाखा कक्ष-२च्या धडक कारवाईत देशी विदेशी मद्यसाठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कसळखंड या ठिकाणी गुन्हे शाखा कक्ष-२ च्या पथकाने टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात देशी विदेशी मद्यसाठा हस्तगत करण्यात आला असून या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

गुन्हे शाखा कक्ष-२चे वपोनि गिरीधर गोरे यांना बातमीदाराकडून कसळखंड या ठिकाणी एका व्यक्तीकडे बेकायदेशीररित्या देशी विदेशी मद्यसाठा व गावठी हातभट्टीची तयार दारू विक्रीसाठी जवळ बाळगत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक भरत पाटील, गुन्हे शाखा कक्ष-२चे पो हवा सचिन पवार, सुनिल साळुंखे, कुदळे, पोना प्रफुल्ल मोरे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून देशी विदेशी मद्यसाठा, हातभट्टीची तयार दारू व इतर ऐवज असा मिळून १२, ३६० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करून या प्रकरणी एकाला ताब्यात घेऊन त्याच्यावर कलम ४१ (१)(अ) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस हवालदार सचिन पवार करीत आहेत.

## १६ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर ,सेक्टर १२ येथे राहणाऱ्या एका इसमाच्या खात्यावर खोटे कर्ज घेऊन जमा केलेली १३ लाख ७५ हजार ८४५ रुपये आणि क्रेडिट कार्ड वरुन तीन लाख रुपये अशी एकूण १६ लाख ७५ हजार ८४५ रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अरविंद कुमार मगनलाल कुमावत हे राजस्थान येथे मुलाच्या जन्म निमित्त कार्यक्रम साजरा करण्यासाठी जात होते. यावेळी त्यांना नेटवर्क नसल्याने त्यांचा नंबर बँक खात्यांना व क्रेडिट कार्ड लिंक केलेला असल्याने बँकेचे व्यवहार करण्यामध्ये अडचणी येत होती. ते गावी असताना त्यांना त्यांचा मोबाईल नंबर कंपनीचे सिस्टीम मध्ये दिसून नसून बंद करण्यात आले असल्याची माहिती मिळाली.

ते मुंबईला परत आल्यानंतर त्यांनी त्यांच्या कोटक महिंद्रा बँक, खारघर येथील खात्याला लिंक असणाऱ्या क्रेडिट कार्डचे पेंडिंग बिल भरत असताना लिमिट पेक्षा जास्त बॅलन्स वजा झाले असल्याचे लक्षात आले. यावेळी त्यांच्या खात्यातून एकूण १६ लाख ७५ हजार ८४५ रुपये वजा झाले.

मोबाईल सिम कार्ड हॅक करून आणि बंद करून तसेच सिमचा वापर करून अज्ञात इसमाने ऑनलाइन पद्धतीने रक्कम वळवून घेऊन अरविंद कुमार यांची फसवणूक केली आहे.

# सागरी महामार्गाच्या प्रकल्प विकास आराखड्यात पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पोहोच रस्त्यांचा समावेश

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मान्यता ; आदिती तटकरे यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य शासनामार्फत विकसित करण्यात येणाऱ्या सागरी महामार्गाच्या प्रकल्प विकास आराखड्यामध्ये पर्यटनस्थळांचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी, पर्यटनास चालना देण्यासाठी व पर्यटकांना इच्छित पर्यटनस्थळी पोहोचण्यासाठी चांगल्या पोहोच रस्त्यांची आवश्यकता आहे. रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील ९३ पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पोहोच रस्त्यांचा समावेश सागरी महामार्गाच्या मूळ विस्तृत प्रकल्प आराखड्यामध्ये प्राधान्याने करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागास व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. यांना आदेशित करण्याची मागणी पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली होती.



उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी कोकण विकासासाठी या पर्यटनस्थळांच्या पोहोच रस्त्यांचा सागरी महामार्गाच्या विकासाबरोबर प्रकल्प आराखडा तयार करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून त्याबाबत मंत्रालयात संबंधित विभागांची नुकतीच बैठक संपन्न झाली असून या बैठकीत त्यांनी रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील ९३ पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पोहोच रस्त्यांचा समावेश सागरी महामार्गाच्या मूळ विस्तृत प्रकल्प आराखड्यामध्ये प्राधान्याने करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागास व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. यांना आवश्यक ते निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्राला निसर्गरम्य असा ७२० कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. पर्यटनाकरिता याचा पुरेपूर वापर होण्यासाठी व कोकणातील परिसर टुरिस्ट कॉरिडॉर म्हणून विकसित करण्याकरिता महत्त्वाकांक्षी अशा सागरी महामार्गाचा विस्तृत प्रकल्प आराखडा बनविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागामार्फत सुरु आहे. या प्रस्तावित सागरी महामार्गालगत अनेक निसर्गरम्य पर्यटनस्थळे आहेत. या निर्णयामुळे आता या पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची स्थितीत लवकरच सुधारणा होवून कोकणातील पर्यटन व्यवसायास मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.

## मुस्लिम कम्युनिटी कडून कोविड रुग्णांसाठी मदतीचा हात



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील कोविड सेंटरमधील रुग्णांना उत्तम सुविधा मिळावी व रुग्ण लवकर बरे व्हावे यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे करण्यात येत आहे. उरणमधील मुस्लिम कमिटीने देखील आपल्या पवित्र रमजान महिन्यातील खर्च कमी करून, काही भाग हा कोविड रुग्णांच्या मदतीसाठी दिला आहे. या मदतीमधून कोविड केंद्रासाठी आवश्यक साहित्य देण्यात आले आहे.

उरण तालुक्यासाठी कार्यरत असलेले कोविड सेंटर काही दिवसांपूर्वी कर्मचारी संख्या कमी असल्याने दोन डॉक्टर आणि दोन नर्स यांना रुग्णांसाठी सेवा देण्यात ताणाताण होत होती.त्यामुळे रुग्णांना सेवा मिळत नसल्याची चर्चा सुरू होती. मात्र येथील खाजगी ३० डॉक्टरांच्या टीमने मोफत सेवा देण्याचा निर्णय घेऊन रुग्णांना उत्तम सेवा देण्याचा वसा घेतला आहे. तर आत येथे आवश्यक असणाऱ्या वस्तू मदती स्वरूपात देण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्था पुढे सरसाऊ लागल्या आहेत.

अशाच प्रकारे उरण तालुक्यातील मुस्लिम कम्युनिटीने येथील कोरोना सेंटर मधील रुग्णांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. खैरुद्दारिन ट्रस्ट, युनायटेड चॅरिटेबल ट्रस्ट, हयातुल इस्लाम गरीब नवाज ट्रस्ट या संस्थांनीही यामध्ये सहभाग घेतला आहे. महत्वाचं म्हणजे रमजान या पवित्र महिन्यातील होणारा खर्च कमी करून, ही मदत करण्यात आली आहे. यावेळी कोणताही धार्मिक भेतभाव न ठेवता एकमेकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याची वेळ आज असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## श्रीवर्धनमधील रुग्णालयांना वैद्यकीय साहित्य वाटप ; शिक्षण परिषद श्रीवर्धन शाखेचा स्तुत्य उपक्रम

**दै.रायगड नगरी । दिघी**

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद प्राथमिक रायगड विभागाच्या श्रीवर्धन शाखा यांच्या सौजन्याने कोरोना पार्श्वभूमीवर तालुक्यातील रुग्णालयांना वैद्यकीय साहित्य वाटप करण्यात आले.



महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागतर्फे तालुक्यातील तीन रुग्णालयांना वैद्यकीय साहित्य वाटप करण्यात आले. या विभागाने आता पर्यंत अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. या उद्देशाने यावेळी उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन, प्राथमिक आरोग्य केंद्र वाळवटी व प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्लीपंचतन येथे वैद्यकीय साहित्याचे वाटप शिक्षक परिषद अध्यक्ष जयवंत लाखण यांच्या हस्ते करण्यात आले.

या संघटनेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या संकल्पनेतून व जिल्हाध्यक्ष संजय निजापकर यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोना संकटात रक्तदान, अन्नदान, कोविड केंद्र, आर्थिक मदत, वैद्यकीय मदत इ. उपक्रम राबविले गेले आहेत. या कार्यक्रमाला श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुकर ढवळे, अध्यक्ष जयवंत लाखण, कार्याध्यक्ष जगन्नाथ पवार, निलेश श्रीवर्धनकर, भिकू पांगारकर, धर्मा धामणकर, प्रशांत वाणी,अनिल मुंडकर, मनोज माळवदे, राजेश तोडणकर, विनायक पारधी, महंमद तारेक, सीमा चव्हाण, अनुजा भुसाणे, प्रियांका पुलेकर, प्रणाली पवार व रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते. सद्या तालुक्यातील रुग्णालयांना आवश्यक बाबींची विचारणा केल्यानंतर रुग्णांना नियमित लागणाऱ्या पाणी व साबण या वस्तूंची उपलब्धता मिळावी याची माहिती संघटनेला देण्यात आली. या अनुषंगाने पाणी, साबण, फेस शिल्ड, ऑक्सीमीटर, सॅनिटायझर, मास्क, हॅण्ड ग्लोज, अशा उपयुक्त वैद्यकीय साहित्य वाटप करण्यात आले.

## नांदगावच्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात लसीकरणाला उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाची साखळी तोडण्यासाठी शासनाने लसीकरणाला मोठ्या प्रमाणावर सुरुवात करण्यात आली असून मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात नुकत्याच सुरू करण्यात आलेल्या लसीकरणाला पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येते आहे.

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन रुग्ण संख्या वाढत असल्याने शासनाने मोठ्या प्रमाणावर लसीकरणाला सुरुवात करण्यात आली आहे. मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात नुकतीच दि.९मे रोजी लसीकरणाला सुरुवात करण्यात आली. यामुळे नांदगाव, मजगांव, उसरोली, वेळास्ते हद्दीतील लोकांना सोयीचे झाले आहे. या आरोग्य उपकेंद्रात ४५ वर्षांवरील सर्वांना कोरोना लसीकरणाला सुरुवात करण्यात आली आहे. आतापर्यंत ३१० जणांनी या लसीकरणाचा लाभ घेतला असून पंचक्रोशीतील नागरिकांचा लसीकरणाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. शासनाकडून जसजसा लसीचा पुरवठा होईल तसे लसीकरण जलदगतीने करण्यात येईल.आजुबाजूच्या परीसरातील लोकांनी लसीकरणाचा लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ.नाझिर कबले यांनी केले आहे.

# अश्वचारा वाटपावरून माथेरानमध्ये दोन संघटनेत गोंधळ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

राज्यात लॉक डाऊन सुरू झाल्याने माथेरानमध्ये पर्यटन व्यवसाय ठप्प झाला होता व येथील अश्व चालकांची हलाखीची परिस्थिती लक्षात घेऊन माथेरान व येथील अश्व चालकांवर प्रेम करणाऱ्या अनेक दानशूर व्यक्ती समोर येऊन माथेरानला घोड्यांसाठी मदतीचा ओघ सुरू झाला होता पण येणाऱ्या मुबलक मदतीमुळे येथील दोन संघटनांमध्ये वाद निर्माण झाला असून चारा वाटपात घोळ होत असल्याचे आरोप होऊ न हा वाद विकोपाला गेला आहे.

माथेरान मध्ये पर्यटकांसाठी घोडा हा प्रवासाचे मुख्य साधन म्हणून वापरले जाते व फक्त घोडेस्वारीसाठी माथेरानमध्ये अनेक गर्भश्रीमंत लोक नियमित येत असतात व त्यांचे येथील स्थानिक अश्वाचालकांन सोबत घरोप्याचे संबंध निर्माण झाले आहेत. त्यात अनेक सिने कलावंतही आहेत ज्या ज्या वेळेला अश्वाचालकांना मदतीची गरज भासते तेव्हा ही अश्वप्रेमी एकत्र येऊन समोर येत असतात माथेरानचे पर्यटन बंद झाल्याने येथील घोड्यांचा चारा व खाद्याची गरज आहे असे येथील स्थानिक अश्वपाल संघटनेने आव्हान करताच येथे मदतीचा ओघ सुरू झाला होता. त्याचवेळेस येथील दस्तुरीनाका येथे व्यवसाय करीत असलेल्या मुळवासीय अश्वपाल संघटनेनेही असेच आव्हान केल्यानंतर त्यांच्याकडेही मदत पोहचली होती. दोन्ही संघटनांना वेगवेगळ्या दानशूर व्यक्तिंनाकडून मदत मिळाल्याने ह्या संघटना आपापल्या सभासदांना भुसा व चारा वाटप करीत होत्या. पण आज येथे वाटपासाठी आलेल्या १३६ गोणी भुसा वरून दोन्ही संघटनांमध्ये संघर्ष निर्माण झाला असून दोन्ही संघटनांनी एकमेकांवर भुसा वाटपमध्ये घोळ करीत असल्याचे थेट आरोपच केले आहेत. त्यातील मुळवासीय अश्व पालक संघटनेने स्थानिक अश्वपाल संघटनेवर धनगर समाजातील अश्व चालकांना डावलून आपल्या मर्जीतील लोकांना भुसा वाटप करीत असल्याचा आरोप केला तर स्थानिक अश्व पाल संघटना ही कोणताही जातीभेद न करता सर्व सभासदांना समान भुसा वाटप कसा करता येईल ह्याकडे नेहमीच लक्ष देत असल्याचे सांगितले.

पर्यटन बंद असताना अशा प्रकारचा वाद होणे ही दुर्दैवी घटना असून आतापर्यंत दोन्ही संघटनांनी आलेली मदत आपल्या सभासदांना वाटप केली आहे व स्थानिक संघटनेचे श्री शैलेश शिंदे यांनी ह्यावर तोडगा काढताना जो मदत आणेल त्यांनी आपल्या संघटनेच्या सभासदांमध्ये वाटप करावी ज्याला कोणाचाही आक्षेप नसावा असे सर्वांना सुचविले आहे.



> माथेरान मध्ये स्थानीक धनगर समाजाच्या घोडेवाल्यान वर होतोय अन्याय, माथेरानमध्ये ४६० घोड्यांचा भुसा येत आहे परंतु त्यातील नेमके स्थानिक धनगर समाजातीलच सदस्यांना हा येणारा भुसा स्थानिक अश्वपाल संघटनेकडून डावला जातोय. जवळ जवळ तीन तीन पिढ्या या सदस्यांच्या या धंद्यामध्ये जाऊन पण यांना डावलले जात आहे. यामध्ये आम्ही धनगर समाजामध्ये जन्म घेतला ही आमची चुकी जाली का ह्या बाबतीत आमचा एकच प्रश्न आहे की यामध्ये आमच्या धनगर समाजातील लोकांनाच का डावलले जातंय. या पुढे सर्व प्राणीमात्रांना नम्र विनंती आहे की ज्यांना भुसा वाटत करायचा असेल तर कृपया त्यांनी स्वतः येउन भुसा वाटप करावा जेणे करून सर्वांना भुसा मिळेल अन्यथा भुसा नाही दिला तरी चालेल.
>
> **राकेश कोकळे अध्यक्ष स्थानिक धनगर समाज माथेरान**

> माथेरान अश्वपाल संघटना ही एक कुटुंब असून त्यामध्ये सर्व धर्मीय सभासद ह्या मदतीचा लाभ घेत असतात मुळवासीय संघटनेकडून नेहमीच पर्यटकांची फसवणूक होत असते पण स्थानिक अश्व चालक इनामे व्यवसाय करीत असल्याने अनेकजण स्थानिकांना मदत करण्यास नेहमीच तत्पर असतात जी सर्व सभासदांमध्ये समान वाटणी केली जाते पण मुळवासीय संघटना आलेली मदत फक्त स्वतःच्या संघटनेतच वाटप करीत असल्याने त्यांना आमच्या संघटनेकडे मदत मागण्याचा नैतिक अधिकार नाही.
>
> **श्रीमती आशाताई कदम अध्यक्षा स्थानिक अश्वपाल संघटना**

## कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने लहान मुलांच्या आरोग्याबाबतीत योग्य उपाययोजना करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कोरोनामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. आरोग्य यंत्रणेने तिसऱ्या लाटेची पूर्व सूचना दिल्याने आगामी काळात नागरिकांच्या आरोग्याची विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. संभाव्य तिसऱ्या लाटेमुळे लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता तज्ञांनी वर्तवली आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने लहान मुलांच्या आरोग्याबाबतीत योग्य उपाययोजना करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते आणि पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यानी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, रायगड्च्या पालकमंत्री, पनवेल पालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संपूर्ण जगात आणि आपल्या भारत दे-शात कोरोनाने २०२० सालापासून हाहाकार माजविला आहे. सन २०२० साली सुरुवातीला देशात कोरोनाची पहिली लाट आली होती. पहिल्या लाटेत जेष्ठ नागरिकांना कोरोनाचा सामना करावा लागला होता. तर आता २०२१ साली कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत युवक आणि जेष्ठांना भयंकर त्रास होऊन अनेकांना आपल्या प्राणांना मुकावे लागले आहे. कुटुंबातील कर्ता गमावल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. तर तरुणांना सुद्धा या आजारांमध्ये आपले प्राण गमवावे लागले आहेत. यात अनेक कुटुंबे उध्वस्त झालीत. आता कोरोनाची देशभरात तिसरी लाट येऊ पाहते. तज्ञ व्यक्तींनी तिसऱ्या लाटेचा त्रास लहान मुले आणि नुकतीच प्रसुती झालेल्या मातांना होणार आहे असा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे आपण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पूर्व खबरदारी म्हणून लहान मुलांच्या आरोग्य तज्ञांच्या सोबत चर्चा करून त्या प्रकारे आरोग्य यंत्रणेचे योग्य नियोजन करून लहान मुलांचे कोविड हॉस्पिटल, कोविड सेंटर, ओपीडी सेंटर सुरू करण्याबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. पनवेल महानगरपालिकेने गंभीरतेने विचार करावा आणि तातडीने ठोस पावले उचलावी अशी सूचना विरोधी पक्षनेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी आयुक्तांना केली आहे.

## महानगरपालिका क्षेत्रात ड्राईव्ह ईन लसीकरण केंद्र सुरु : परेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ड्राईव्ह ईन कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्र सुरु करण्यात यावे, अशी मागणी पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुंबई व नवी मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातही ड्राईव्ह इन लसीकरण केंद्र सुरू करावे, अशा मागणीचे पत्र भाजप सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांनी सभागृह नेते परेश ठाकूर यांना दिले होते. या पत्राच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यासंदर्भात सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आयुक्तांना निवेदन देऊन मागणी केली आहे

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गेल्या काही आठवड्यापासून लॉकडाऊन लावण्यात आलेला आहे. परिणामी महानगरपालिका क्षेत्रात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव हा काहीसा कमी होताना दिसत आहे, परंतु जसे व्यवहार सुरु होतील आणि अनलॉक होत जाईल तसे पुन्हा कोरोनाचे संकट बळावण्याची शक्यता आहे. कोरोनाच्या तिसर्याप लाटे बाबतदेखील सूचना पहायला मिळत आहे. कोरोना सोबत जगणे हे आपल्याला शिकावेच लागणार आहे आणि त्याकरीता आपल्या क्षेत्रातील प्रत्येक नागरिकाने कोविड प्रतिबंधात्मक लस घेणे गरजेचे आहे. महानगरपालिकेची लोकसंख्या बघता, होणारे लसीकरण व सध्या कार्यरत असलेले केंद्र हे अपुरे आहेत असे लक्षात येते. आपण लसींचा पुरवठा वाढवावा, तसेच लसीकरण केंद्रही वाढविणे आवश्यक आहे. खारघर येथील लिटिल वर्ल्डस मॉल अथवा सेंट्रल पार्क चा परिसर आणि पनवेल येथील ओरियन मॉल अथवा वडाळे तलावाच्या परिसरात हे लसीकरण केंद्र सुरू करता येऊ शकते. लसीकरणाची प्रक्रिया ही जितकी सोपी आणि सुटसुटीत राहील तितका त्याला प्रतिसाद जास्त मिळेल. ड्राईव्ह इन लसीकरण केंद्र हे त्या दृष्टीने एक पाऊल असणार आहे, त्यामुळे मुंबई व नवी मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ड्राईव्ह इन लसीकरण केंद्र सुरू करावे जेणेकरून ज्येष्ठ व दिव्यांगांना याचा फायदा होईल, तसेच हा उपक्रम सुरु केल्यास असे नागरिक जे कोरोनाच्या भीतीने लसीकरण केंद्रावर जाण्यासाठी घाबरत आहेत ते देखील लसीकरण करायला पुढे सरसावतील, असेही सभागृहनेते परेश ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात अधोरेखित केले आहे.

